# गांवकरी

## नवी मुंबई / ठाणे

# आज

शनिवार दि. १८ फेब्रुवारी २००६

# होमिओपॅथी रोग समूळ नष्ट करते

• संगीता मिश्रा

होमिओपॅथिक डॉक्टरांना समाजात दुय्यम स्थानावर ठेवले जाते. ऍलोपॅथिक डॉक्टरांना जेवढी मान्यता समाजात आहे तेवढी होमिओपॅथिक डॉक्टरांना नाही. हा समज बदलण्याचे कार्य डॉ. अनिता संजय साळुंखे यांनी केले आहे. जिथे ऍलोपॅथी रोग्याला बरे करण्याचे प्रयत्न करते तिथे होमिओपॅथी रोग समूळ नष्ट करते डॉ. अनिता साळुंखे होमिओपॅथीकडे वळल्या त्याचे हेच कारण होते.

आखाती देशात आंब्यांची निर्यात करणारे श्री काळे यांची कन्या अनिता हिचे बालपण फारच लाडात गेले. घरात सर्व सुखसोयी होत्या. त्यांनी गरिबी पाहिली नाही पण गरिबांना नाइलाजाने ऍलोपॅथी उपचाराकरिता पैसे बर्बाद करताना पाहून त्यांचा निश्चय केला की हा समज खोडून काढला पाहिजे. म्हणून त्यांनी आपला पहिला दवाखाना चेंबूरच्या झोपडपट्टीत उघडला. त्याचबरोबर त्या एका वरिष्ठ डॉक्टरांकडे होमिओपॅथी शिकू लागल्या. चेंबूर येथींल जॉय हॉस्पीटलमध्ये रात्रपाळीत काम करणाऱ्या त्या प्रथम महिला डॉक्टर होत्या. सकाळी घरी येऊन कॉलेजला यायचे व रात्री हॉस्पीटलमध्ये काम करायचे. उरलेल्या वेळात चेंबूरचा दवाखाना सांभाळायचा हा त्यांचा दिनक्रम होता. आताच्या तरुणांची तुलना करायची झाल्यास आपल्या खेळण्या–बागडण्याच्या दिवसांची त्यांनी स्वतःच्या उद्देश्यपूर्ती साठी बळी दिला असेच म्हणावे लागेल. आपल्या आवडीला त्यांनी व्यवसायात बदलले. मुंबईला येऊन डॉ. अनिता यांनी होमियोपॅथी द्वारा लोकांच्या असाध्य रोगांना बरे करण्याचे काम सुरु केले. तेव्हा त्यांच्याकडे एक स्कूटी होती. त्यावरून त्यांनी दिवस–रात्र आजाऱ्यांची सेवा केली. होऊन सुद्धा काही फरक पडत नव्हता. डॉ. अनिता उपचारामुळे १५ दिवसात ती विनाप्रयास खूर्चीवर बसू लागली. चाळीसगाव येथून आलेल्या श्रीमती कर्णिक अंगभर झालेल्या सुरायसिसने त्रस्त होत्या. ऍलोपॅथीची औषधे खाऊन हैराण झाल्या होत्या. एक वर्षाच्या उपचाराने त्या पूर्णपणे बऱ्या झाल्या असे अनेक रुग्ण डॉ. अनिता यांच्या प्रभावी उपचारामुळे सामान्य जीवन जगत आहेत. डॉ. अनिता या बालरोग विशेषज्ञ आहेत. लहान मुलांच्या अनेक आजारपणामुळे त्यांचे पालक चिंताग्रस्त असतात. डॉ. अनिताने लहान मुलांच्या सर्व रोगांवर सहजतेने इलाज करुन त्यांना चिंतामुक्त करत असतात.

असे म्हणतात की प्रत्येक सफल पुरुषामागे एक स्त्री असते आणि स्त्रीच्या उन्नतीमागे तिची अदम्य इच्छाशक्ती असते. याच इच्छाशक्तीच्या बळावर स्त्री समाजाच्या कुरातींशी संघर्ष करते व पुढ जाते. याबाबतीत डॉ. अनिल आपले पती श्री संजय साळुंखे यांनी दिलेल्या प्रोत्साहनाला कधीच विसरत नाही. श्री. संजय साळुंखे उच्चविद्याविभूषित आहेत. ते एम. बी. ए. आहेत. डॉक्टर आहेत आणि एल. एल. बी. पण आहेत. या शिवाय ते एक सफल उद्योजक आहेत. त्यांची नेट टेक्नोलोजीची फर्म आहे व त्याचा विस्तार बँगलोर पर्यंत आहे. त्यांचाच प्रोत्साहनामुळे डॉ. अनिताने एम.डी. होण्याचे साहस केले. होमिओपॅथीला इंटरनेट द्वारा विश्वव्यापक बनविण्यात श्री. संजय साळुंखे यांचा सिंहाचा वाटा आहे. त्याचाच परिणाम म्हणून आज परदेशातून डॉक्टर्स भारतात येऊन होमिओपॅथी शिकत आहेत.